

# आपल्या पाळकाची मदत कशी करावी

आशीष रायचूर

**केवळ विनामूल्य वितरणासाठी**
**ऑल पीपल्स चर्च अँड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे मुद्रित व वितरित.**
**प्रथम संस्करण मुद्रित,**
**संपर्क** : All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA
Phone: +91-80-25452617
Email: bookrequest@apcwo.org
Website: **apcwo.org**
अन्यथा सूचित केले नसल्यास, बायबलचे सर्व संदर्भ पवित्र बायबल, बायबल सोसायटी ऑफ इंडिया आवृत्तीतून घेण्यात आले आहेत. सर्व हक्क स्वाधीन.
बायबल व्याख्या, इब्री व ग्रीक शब्द तसेच त्यांचे अर्थ खालील पुस्तकांतून घेण्यात आले आहेत:
Thayer's Greek Definitions, Published in 1886,1889; public domain
Strong's Hebrew and Greek Dictionaries, Strong's Exhaustive Concordance by JamesStrong, T. D.LLD. Published in 1890; public domain
Vine's Complete Expository Dictionary of Old and New Testament Words,@1984,1996, Thomas Nelson, Inc, Nashville, TN.
**आर्थिक साझेदारी**

**या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे “ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी” हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**डाक यादी**

आमची नवीन पुस्तके मिळविण्यासाठी आपणास आपले नाव आमच्या डाकयादीत नोंदवावयाचे असल्यास कृपया ईमेलद्वारे आपला अचूक पत्ता आम्हास पाठवावा

**apcwo.org**

**भारतात विनामूल्य बल्क**

# आपल्या पाळकाची मदत कशी करावी

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **परिचय** | **1** |
| **1. पाळक आणि मंडळीच्या कर्मचाऱ्यांची उद्दिष्ट्ये** | **3** |
| **2. आपल्या पाळकाची मदत कशी करावी** | **6** |
| **3. आपला पाळक मानव आहे** | **17** |

# परिचय

एक मजबूत चर्च बनविण्याच्या इच्छेने, त्यात मजबूत लोकांना तयार करून, मी हा संदेश देत आहे, "तुमच्या पाळकांना कशी मदत करावी?" मला विश्वास आहे की असे करण्यामागे माझ्या मनाची प्रेरणा आपणास समजेल. या पुस्तकात दिलेला संदेश वैयक्तिकरित्या कोणाच्याही विरोधात नाही. जर मला कोणाशी वैयक्तिक खुलासा करायचा असेल, तर मी ते पुस्तकाद्वारे नव्हे तर परस्पर संपर्काद्वारे करेन.

आपल्यापैकी जे पालक आहेत त्यांना माहीत आहे की मुलांचे संगोपन करीत असतांना, जरी आम्ही बहुतेक वेळा त्यांच्यावर प्रेमाचा वर्षाव करतो, तरी काही वेळा असे होते जेव्हा आम्हाला छडी काढावी लागते! याचे कारण असे नाही की आपण आपल्या मुलांचा तिरस्कार करतो पण यासाठी की आपण त्यांना मजबूत लोक बनविण्यासाठी त्यांचे संगोपन करू इच्छितो. त्याचप्रमाणे, जेव्हा आपल्याला चर्चमध्ये मजबूत लोक तयार करावयाचे असतात, तेव्हा आपण त्यांना परमेश्वराच्या मंदिरात काय करावे हे शिकवले पाहिजे.

**1 तीमथ्य. 3:15**

**15 तरीपण मला उशीर लागल्यास सत्याचा स्तंभ व पाया अशी जी जिवंत देवाची मंडळी आहे तिच्यात म्हणजे देवाच्या घरात कसे वागले पाहिजे, हे तुला समजावे.**

पौल तीमथ्याला लिहितो की स्थानिक मंडळीत वागण्याची एक योग्य पद्धत आहे. दुसऱ्या शब्दांत, पौल म्हणतो की परमेश्वराच्या मंदिरात वागण्याची एक योग्य पद्धत आहे आणि विश्वासणाऱ्यांना ते शिकविण्याची गरज आहे. दुःखाची गोष्ट ही आहे की या विषयावर फारशी शिकवण दिली जात नाही आणि प्रत्येक जण जे योग्य वाटेल ते करण्याचा प्रयत्न करतो. मंडळीतील लोक त्यांच्या मनात असेल ते करतात आणि चर्चला वेगवेगळ्या दिशेने खेचतात आणि अशा प्रकारे चर्च कुठेही जात नाही! जर प्रत्येकाने त्याला किंवा तिला जे योग्य वाटेल तसे केले तर आपल्याकडे अराजकता आणि गोंधळाने भरलेले प्रार्थनास्थळ असेल. पण परमेश्वर गोंधळाचा कर्ता नाही.

**1 करिंथ 1:10**

**बंधुजनहो, आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या नावाने मी तुम्हांला विनंती करतो की, तुम्हा सर्वांचे बोलणे सारखे असावे; म्हणजे तुमच्यामध्ये फुटी पडू नयेत; तुम्ही एकचित्ताने व एकमताने जोडलेले व्हावे.**

पवित्र शास्त्रात विनंती किंवा सूचना नाही, परंतु एक विनंती अथवा आग्रह आहे जो स्वतः

परमेश्वराच्या अधिकाराने येतो. प्रेषित पौलाद्वारे स्थानिक मंडळीसाठी प्रभु काय आज्ञा देतो ते येथे लिहिलेले आहे:

- तुम्हा सर्वांचे बोलणे सारखे असावे. असे वाटू शकते की हे अशक्य आहे.
- तुमच्यामध्ये फुटी (विभाजन) पडू नयेत.
- तुम्ही एकमेकांशी सिद्धपणे जोडलेेले असावे (पूर्णतः एकमत).
- तुम्ही सर्वांनी एकचित्त व एकमत असावे.
- तुमचा एकच संकल्प, हेतू, आणि मत असावे.

जेव्हा आपण करिंथकरांच्या मंडळीचा विचार करतो, तेव्हा आम्हास दिसून येते की आजच्या कोणत्याही मंडळ्यांसारखी ही देखील “विशिष्ट“ मंडळी होती. तेथे अनेक गोष्टी चुकीच्या होत्या. काही लोकांचे असे म्हणणे होते की ते अपुल्लोसचे आहेत, तर इतरांचे म्हणणे असे होते की ते पौलाचे आहेत. विवाह, मूर्तींना वाहिलेले अन्न, अन्यान्य भाषा बोलणे, आत्म्याची कृपादाने इत्यादी गोष्टींबाबत त्यांच्यात विभिन्न मते होती. सर्वात गंभीर अपराध हा होता की ते प्रभूभोजनाच्या मेजावर न्याहारी घेत, भाकरीचा लहान तुकडा किंवा दाखरसाचा लहानसा प्याला घेऊन ते थांबत नसत, तर पूर्ण भाकर आणि मोठा प्याला त्यांना हवा असे! त्यांच्या वर्तनाबद्दल पौलाला त्यांची कानउघाडणी करावी लागली आणि त्यांस योग्य वागणूक करण्याविषयी शिकवावे लागले (1 करिंथ. 11:17-33). अशाप्रकारे पौल विविध पार्श्वभूमीच्या लोकांस लिहित आहे आणि त्यांस सारखे बोलण्याविषयी शिकवित आहे, त्यांच्यामध्ये आपसात फुटी नसाव्या, त्यांनी एकमेकांशी सिद्धपणे जुळलेले असावे आणि एकचित्त, एकमत असावे, आणि त्यांचा एकच समज व एकच संकल्प असावा.

माझा विश्वास आहे की जर प्रभू आम्हास काहीतरी करावयास आज्ञा देत असेल, तर हे शक्य आहे कारण प्रभू आम्हाला असे काहीही करावयाची आज्ञा देणार नाही जे करावयास आम्ही असमर्थ आहोत. जर त्याला असे करावयाचे असते, तर त्याचा अर्थ खिजविणे असता. आमच्यासाठी अशाप्रकारची मंडळी बनणे शक्य आहे ज्याविषयी पौल बोलत आहे आणि हेच प्रत्येक पाळकास आपल्या मंडळीसाठी हवे असते.

# 1. पाळक आणि मंडळीच्या कर्मचाऱ्यांची उद्दिष्ट्ये

आपण आपल्या पाळकांची कशी मदत करू शकता या विषयी चर्चा करण्यापूर्वी, आपण आधी हे समजू या की पाळकाची आणि मंडळीच्या कर्मचाऱ्यांची काय उद्दिष्टे आहेत.

**यिर्मया 3:15**
**मी तुम्हांला माझ्या मनासारखे मेंढपाळ देईन; ते तुम्हाला ज्ञान व अक्कल ह्यांनी तृप्त करतील.**

परमेश्वराच्या मनासारखे मेंढपाळ म्हणून, पाळकांनी परमेश्वराच्या लिखित वचनातून आत्मिक ज्ञान आणि समजासह परमेश्वराच्या लोकांस भरवावे, इतर माध्यमाने नव्हे. पाळकाने परमेश्वराच्या पवित्र आत्म्याद्वारे येणारा समज दिला पाहिजे.

**इफिस 4:11-13**
**11 आणि त्यानेच कोणी प्रेषित, कोणी संदेष्टे, कोणी सुवार्तिक, कोणी पाळक व शिक्षक असे नेमून दिले;**
**12 ते ह्यासाठी की, त्यांनी पवित्र जनांना सेवेच्या कार्याकरता व ख्रिस्ताच्या शरीराची रचना पूर्णतेस नेण्याकरता सिद्ध करावे.**
**13 देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या व तत्संबंधी परिपूर्ण ज्ञानाच्या एकत्वाप्रत, प्रौढ मनुष्यपणाप्रत, ख्रिस्ताची पूर्णता प्राप्त होईल अशा वृद्धीच्या मर्यादेप्रत आपण सर्व येऊन पोहचू तोपर्यंत दिले...**

पवित्र शास्त्रातील हा उतारा पाळकाच्या कामाचे आणि वचनाची सेवा करण्यात सहभागी असलेल्यांचे वर्णन करतो. पाळकाला सेवेचे काम करावयाचे आहे - जे आपण करायला हवे! आपण सेवक आहात. चर्चमध्ये आपल्या बाजूला बसलेला वेगळा असणारा व्यक्ती आपल्यासोबत सेवेचे कार्य करणार आहे, पाळक नाही, शिक्षक नाही, सुवार्तिक नाही, संदेष्टा नाही किंवा प्रेषितही नाही - कारण पाच प्रकारच्या सेवेची भूमिका आहे पवित्र जणांना सेवेच्या कार्याकरता सिद्ध करावे. पाळकाचे काम खरे म्हणजे फार सोपे आहे - ते आहे आपणास तयार करणे. ते काम पूर्ण करणारे आपण आहात! आपण केवळ मंडळीचे सदस्य नाही तर आपण सेवकही आहात. आपण मंडळीची "सदस्य मानसिकता" बाळगू शकत नाही. आपण सर्वसमर्थ परमेश्वराचे सेवक आहात आणि आपण येथे यासाठी आहात की आपणास सेवेच्या कार्यासाठी, ख्रिस्ताच्या मंडळीस पूर्णतेस नेण्याकरता सिद्ध केले जावे *"...विश्वासाच्या व तत्संबंधी परिपूर्ण ज्ञानाच्या एकत्वाप्रत, प्रौढ मनुष्यपणाप्रत, ख्रिस्ताची पूर्णता प्राप्त होईल अशा वृद्धीच्या मर्यादेप्रत आपण सर्व येऊन पोहचू तोपर्यंत..."* (इफिस 4:13). पाळक म्हणून आणि मंडळीचे कर्मचारी म्हणून आपली जबाबदारी

पवित्र जनांस ख्रिस्ताच्या पूर्णतेत येण्यासाठी तयार करणे आहे, जेणेकरून पवित्र जनांस सेवेचे कार्य करता यावे. परमेश्वराची इच्छा आहे की प्रत्येक सेवकाने त्याच्या राज्यात सेवक बनावे.

**कलस्सै 1:28**

**आम्ही त्याची घोषणा करतो, सर्व प्रकारच्या ज्ञानाने प्रत्येक माणसाला बोध करतो व प्रत्येक माणसाला शिकवतो; अशासाठी की, प्रत्येक माणसाला ख्रिस्त येशूच्या ठायी पूर्ण असे उभे करावे.**

पाळक तुमचे मनोरंजन व्हावे यासाठी प्रचार करीत नाहीत आणि शिकवीत नाहीत परंतु यासाठी की त्यांनी विश्वासणाऱ्यांस ख्रिस्तामध्ये सिद्ध असे सादर करावे. पवित्र शास्त्रात येथे वापरण्यात आलेला शब्द आहे *'teleios'* पूर्ण वाढलेला प्रौढ मनुष्य. आमचे ध्येय प्रत्येक विश्वासणाऱ्यास पूर्णत्वाच्या, सिद्धतेच्या ठिकाणी आणणे आहे - की त्यांनी ख्रिस्ताची पूर्णता प्राप्त करावी. आपण ख्रिस्तामध्ये बाळक असलेल्यांचे स्वागत करतो, पण त्यांनी नेहमीच बाल्यावस्थेत राहावे असे आपणास वाटत नाही. पाळकांची जबाबदारी आहे प्रत्येक व्यक्तीस ख्रिस्तामध्ये पूर्ण असे सादर करणे. जर आपण असे करण्यात विफल राहिलो तर पाळक म्हणून आणि मंडळीचे पुढारी म्हणून आपण अपयशी ठरू.

## प्रत्येक विश्वासणाऱ्याच्या जीवनात साध्य करावयाच्या गोष्टी

चार गोष्टी आहेत ज्या पाळकाने प्रत्येक विश्वासणाऱ्याच्या जीवनात साध्य करण्याची इच्छा धरली पाहिजे. त्यांनी खालील गोष्टींच्या वाढीची आणि विकासाची इच्छा धरली पाहिजे:

- **वचन** : पाळकाची इच्छा असली पाहिजे की मंडळीतील प्रत्येक व्यक्तीने वचनामध्ये दृढ व्हावे.
- **आत्मा** : पाळकाची इच्छा असली पाहिजे की मंडळीतील प्रत्येक व्यक्तीने आत्म्यामध्ये दृढ व्हावे.
- **वचन** : पाळकाची इच्छा असली पाहिजे की मंडळीतील प्रत्येक व्यक्तीने ख्रिस्तासमान चारित्र्यात वाढत जावे.
- **सेवा** : पाळकाची इच्छा असली पाहिजे की मंडळीतील प्रत्येक व्यक्तीने सेवेच्या कार्यासाठी सिद्ध व्हावे.

**गलती 1:10**

**मी आता मनुष्याची किंवा देवाची मनधरणी करायला पाहत आहे? मी मनुष्यांना संतुष्ट करायला पाहत आहे काय? मी अजूनपर्यंत मनुष्यांना संतुष्ट करत राहिलो असतो तर मी ख्रिस्ताचा दास नसतो.**

पाळक आणि परमेश्वराचे सेवक म्हणून आम्हाला ज्या आदर्शासाठी पाचारण करण्यात आले आहे ते आम्ही समजून घ्यावे. गलती 1:10 नुसार, जर आम्ही मनुष्यास प्रसन्न करीत असू तर आम्ही परमेश्वराचे सेवक नाही. पाळक या नात्याने आम्ही येथे लोकांस प्रसन्न करण्यासाठी

नाही. म्हणून जर आपण मंडळीत आनंदी होण्यासाठी आला असाल तर आपण चुकीच्या ठिकाणी आला आहात कारण जर आपण मनुष्यास केवळ प्रसन्न करतो तर आपण परमेश्वराची सेवा करू शकत नाही. आमचे ध्येय आपली वाढ करणे आहे फक्त आपणास प्रसन्न करणे नाही. पण या प्रक्रियेत  आपण आनंदी होऊ शकता जे याचे फक्त दुय्यम उत्पादन आहे! तसेच आपण पाळकावर आणि मंडळीवर प्रीती करू लागू शकता पण ही उद्दिष्टे नाहीत. आमचे उद्दिष्ट आहे आपणास ख्रिस्ताठायी पूर्ण असे सादर करणे. ज्या दिवशी आपण मनुष्यास प्रसन्न करणारे ठरतो त्यादिवशी आपण परमेश्वराचे सेवक बनणे सोडून देतो.

# 2. आपल्या पाळकाची मदत कशी करावी

खालील आज्ञा फक्त पाळकास लागू होत नाहीत तर आपली सेवा करणाऱ्या मंडळीच्या कर्मचाऱ्यांनाही लागू पडतात.

## आपल्या पाळकाच्या साक्षीचे रक्षण करण्यात मदत करणे

**1 तीमथ्य 3:2**

**2 अध्यक्ष अदूष्य, एका स्त्रीचा पती, नेमस्त, स्वस्थचित्त, सभ्य, अतिथिप्रिय, निपुण शिक्षक असा असावा.**

**तीत 1:6-7**

**6 ज्याला नेमायचे तो निर्दोष, एका स्त्रीचा पती असावा; त्याची मुले विश्वास ठेवणारी असावीत. त्यांच्यावर बेतालपणा केल्याचा आरोप आलेला नसून ती अनावर नसावीत.**

**7 अध्यक्ष हा देवाचा कारभारी आहे म्हणून तो निर्दोष असला पाहिजे; तो स्वच्छंदी, रागीट, मद्यपी, मारका, अनीतीने पैसे मिळवणारा नसावा...**

1 तीमथ्य 3:2 नुसार, अध्यक्षाने किंवा आत्मिक पर्यवेक्षकाने “निर्दोष” असले पाहिजे. परमेश्वराच्या स्त्री अथवा पुरुषासाठी आवश्यक असलेल्या इतर सर्व पात्रता पवित्र शास्त्र पुढे सांगते. आत्मिक पुढाऱ्यांकडून परमेश्वर जी पहिली पात्रता मागतो ती ही आहे की त्याने निर्दोष असावे. याचा अर्थ हा आहे की कोणालाही त्याच्याकडे बोट दाखविता येऊ नये आणि त्याला दोष लावता येऊ नये. पुढाऱ्याची साक्ष सिद्ध असली पाहिजे.

**2 करिंथ 6:3-4**

**3 आम्ही करत असलेल्या सेवेत काही दोष दिसून येऊ नये म्हणून आम्ही कोणत्याही प्रकारे अडखळण्यास कारण होत नाही;**

**4 तर सर्व गोष्टींत देवाचे सेवक म्हणून आम्ही आपली लायकी पटवून देतो; फार धीराने, संकटांत, विपत्तींत, पेचप्रसगांत...**

“अडखळण्यास कारण होत नाही” हा आदर्श आहे ज्याचे पालन करण्यासाठी परमेश्वराने पाळकास व मंडळीच्या कर्मचाऱ्यांचा पाचारण केले आहे. आम्हास निर्दोष जीवन जगण्याची गरज आहे - आम्ही अशा प्रकारे सेवा केली पाहिजे की आम्ही कोणालाही अडखळणास कारण देता कामा नये - जेणेकरून त्यांना आमच्या सेवाकार्यास दोष लावता येऊ नये. असे करण्यासाठी आम्हाला आपल्या मदतीची गरज आहे.

**नीतिसूत्रे 22:1**

**चांगले नाव विपुल धनाहून इष्ट होय; प्रेमयुक्त कृपा सोन्यारुप्यापेक्षा उत्तम आहे.**

आपण काही उदाहरणांचा विचार करू या जेथे आपण आपल्या पाळकांच्या साक्षीचे रक्षण करण्यात मदत करू शकता.

- ✓ जर आपण स्त्री आहात तर कृपा करून इतर सर्वजण हजर असताना आपल्या पाळकांना त्यांच्या ऑफिसमध्ये भेटा. अडचणीच्या ठिकाणी किंवा अवेळी आपल्या पाळकांना भेटण्याची विनंती करू नका. आपली गरज खरी असेल परंतु नको त्या ठिकाणी भेटावयाची विनंती करून आपल्या पाळकाला गैरसोयीत टाकू नका. हे पाहणाऱ्यास कसे वाटेल याचा विचार करा - पाळक सार्वजनिक ठिकाणी एक प्याला कॉफी घेत एका स्त्रीला सल्ला देतो. पण पाळकाला ओळखणारे लोक जर या ठिकाणी आले तर ते विचार करतील की हा मंडळीचा पाळक जो विवाहित आहे आणि त्याला मुले आहेत या दुसऱ्या स्त्रीबरोबर एकट्याने काय करीत आहे. मग पाळकाची साक्ष धोक्यात येईल. आपली समस्या कितीही गंभीर असली तरी आपल्या पाळकास त्यांच्या कार्यालयात भेट देणे योग्य ठरेल अन्यथा आपण परमेश्वराच्या माणसाची साक्ष नष्ट कराल.

- ✓ आपण जर स्त्री आहात तर मंडळीतील महिला सेविकेकडून किंवा स्त्री पुढाऱ्यांकडून मदत प्राप्त करणे नेहमीच उचित होईल.

- ✓ पाळकाविषयी किंवा मंडळीविषयी असे काही बोलू नका ज्या विषयी आपल्याला शंभर टक्के खात्री नाही. आपण जे काही म्हणणार आहात त्याविषयी जर आपणास पूर्ण खात्री नसेल तर ते म्हणू नका. उदाहरणार्थ, जर आपले पाळक अमेरिकेत राहत असतील आणि भारतात परत आले असतील तर असे ठरवू नका की त्यांना त्यांच्या सेवेसाठी डॉलर्स येत आहेत. कुठल्याही प्रकारचा दावा करण्यापूर्वी त्याविषयी निश्चित माहिती करून घ्या! आमच्या मंडळीच्या बाबतीत 99 टक्के पैसा भारतातून येतो - आमच्या मंडळीच्या दशमांशाद्वारे, देणग्या आणि भेटींद्वारे. जगाच्या दुसऱ्या भागातील कुठल्याही मंडळया आम्हाला मदत करीत नाहीत.

- ✓ आपले पाळक किंवा मंडळीचे पुढारी जे करीत आहेत त्याविषयी आवश्यकतेपेक्षा जास्त वाहवाही करून बोलू नका. उदाहरणार्थ जर आपली मंडळी बालगृह चालवित असेल आणि आठ मुलांची काळजी घेत असेल तर असे म्हणू नका की मंडळी अनेक मुलांचे मोठे अनाथालय चालवीत आहे.

## आपल्या पाळकांच्या वेळेचे रक्षण करण्यात मदत करा

**इफिस 5:15-16**
**15 म्हणून अज्ञान्यांसारखे नव्हे तर ज्ञान्यांसारखे सभोवार नजर ठेवून जपून चाला.**

**16 वेळेचा सदुपयोग करा, कारण दिवस वाईट आहेत.**

इफिस 5:16 आम्हाला सांगते की आपण “वेळेचा सदुपयोग करावा” - हाती येणाऱ्या प्रत्येक मिनिटाचा उपयोग करावा आणि त्यास कामी लावावे. वेळ हे अधिमूल्य आहे आणि आपल्या सर्वांसाठी खूप महत्त्वाचा आहे. आमच्या चर्चमध्ये, आमच्या कर्मचाऱ्यांनी प्रत्येक आठवड्यात किमान 40 तास काम करणे आवश्यक आहे. आपण आणि मंडळीच्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेळेचे रक्षण करून मदत करू शकता.

- ✓ नेहमीच्या कार्यालयीन वेळेतच पाळकाची भेट घ्यावी. जर पाळक सकाळी 8:30 ते सायंकाळी 6:30 पर्यंत आपल्या कार्यालयात असतील तर आपले काम संपवून त्यांची भेट घेणे आपल्यासाठी सोयीचे होईल म्हणून त्यांना 7:30 पर्यंत थांबण्याची विनंती करू नका. कधी कधी पाळक आणखी थांबून लोकांची भेट घेतात पण कृपा करून हे जाणून घ्या की त्यांना परत कुटूंबाकडे घरी जावयाचे आहे. लक्षात घ्या की जेव्हा आपणास डॉक्टरला भेटावयाचे असते, तेव्हा आपण डॉक्टरने ठरविलेल्या वेळेवर जाता आणि त्याची भेट घेण्यासाठी सुट्टीसुद्धा काढता. याच विचारशीलतेने आपल्या पाळकाशी वागा. जर आपली आध्यात्मिक गरज असेल आणि आपल्यासाठी जाऊन पाळकाची भेट घेणे महत्वाचे आहे, तर आपण आवश्यक व्यवस्था लावण्यासाठी सुट्टी काढा म्हणजे पाळकाला वाट पाहत राहावे लागणार नाही.

- ✓ जर आपल्या मनात काही कल्पना असेल, तर ती पाळकास पूर्ण करावयास सांगू नका! आपले पाळक विचारांचे आणि सूचनांचे स्वागत करीत असतील पण जर आपल्या मनात सेवेसाठी कल्पना असेल, तर अपेक्षा करू नका की आपले पाळक आपल्या कल्पना पूर्णत्वास नेतील. बरेचदा लोक पाळकांकडे आपले विचार घेऊन येतात आणि आग्रह करतात की परमेश्वर एक विशिष्ट सेवा सुरू करण्यासाठी पाळकाचे मार्गदर्शन करीत आहे. जर आपल्या अंतःकरणात गंभीर प्रेरणा असेल आणि आपणास खात्री असेल की आपण काहीतरी सुरू करावे अशी परमेश्वराची इच्छा असेल, तर आपण अर्थातच पाळकाच्या परवानगीने तसे करण्यासाठी पुढाकार घ्यावा.

- ✓ कृपा करून आपल्या पाळकाला पुस्तकांची समीक्षा लिहावयास सांगू नका. कारण आपणा सर्वांना माहीत आहे की त्यांच्या घरी अशी पुस्तके असतील जी त्यांनी वाचली नसतील! कारण त्यांच्याजवळ त्याच्यासाठी वेळ नाही!

- ✓ कृपा करून आपल्या पाळकास असे काही करावयास सांगू नका जे करण्यासाठी इतर उद्योगांस वैशिष्ट्य मिळाले आहे, उदाहरणार्थ, लग्न जोडणे, रियल इस्टेट, इत्यादी. जर आपण

नवीन ठिकाणी राहावयास जात असाल, तर स्थानिक मंडळीच्या पाळकास असे लिहू नका की त्यांनी आपल्यासाठी घर शोधण्यात मदत करावी. पाळक आपल्या सेवेसाठी असले तरीही, आपणासाठी घर शोधण्याची त्यांच्याकडून अपेक्षा करणे म्हणजे फारच झाले. आपणासाठी योग्य जोडीदार शोधण्यासाठी पाळकांवर दबाव आणू नका. असा कोणी असेल जो पाळकास योग्य वाटत असेल, तर ते त्या व्यक्तीविषयी सुचवू शकतात पण त्यासाठी पाळकावर दबाव आणू नका.

## आपल्या पाळकाच्या कुटुंबाचे रक्षण करण्यात मदत करा

**मत्तय 26:31, जखऱ्या 13:7 मधून घेतलेला संदर्भ**

**31 तेव्हा येशू त्यांना म्हणाला, “तुम्ही सर्व ह्याच रात्री माझ्याविषयी अडखळाल; कारण असा शास्त्रलेख आहे की, ‘मी मेंढपाळाला मारीन आणि कळपातल्या मेंढरांची दाणादाण होईल.’**

✓ जर शत्रू मेंढपाळास मारू शकतो, तर तो मेंढरांची दाणादाण करू शकतो. अनेक लोकांस असे वाटते की सेवाकार्य फार “आकर्षक” काम आहे - शक्यतः कारण पाळकाला दर रविवारी 50 मिनिटे उपदेश देता येतो आणि मंडळी त्याचे ऐकते. त्यांना अनेक पुस्तकांचे लेखन करावयास मिळते, त्यांच्या संदेशाच्या अनेक टेप आणि सी.डी. विकता येतात. हे समजून घ्या की परमेश्वराचे सेवक जे सेवेच्या आघाडीवर तुमचे नेतृत्व करतात, ते सैतानाच्या तीव्र आक्रमणांचे मुख्य लक्ष्य आहेत. सैतानाचा हेतू मेंढपाळास मारणे आणि त्याद्वारे मेंढरांचा नाश करणे हा आहे. पाळक आणि परमेश्वराचे सेवक सामान्य विश्वासणाऱ्यांपेक्षा अधिक तीव्र संघर्षास तोंड देतात. म्हणून सर्वात मोठ्या बक्षिसांपैकी एक जे आपण आपल्या पाळकास आणि सेवकांस देऊ शकता ते आहे त्यांच्यासाठी आणि त्यांच्या कुटुंबासाठी नियमितपणे प्रार्थना करणे - त्यांना आपल्या प्रार्थनांची गरज आहे. रक्षक म्हणून त्यांच्याभोवती उभे राहा. आपल्या प्रार्थनांद्वारे त्यांच्याभोवती ढाल उभी करा. सैतानास म्हणा, “जर तुला माझ्या पाळकाला तो बाण मारावयाचा असेल, तर तुला आधी मला तो मारावा लागेल. मी येथे आहे!” जर संपूर्ण मंडळी पाळकासाठी, त्यांची सेवा करणार्या सेवकांसाठी, आणि त्यांच्या कुटुंबासाठी प्रार्थना करीत असेल, तर ती मंडळी मजबूत मंडळी ठरेल कारण पुढाऱ्याचे योग्य संरक्षण होईल आणि मेंढरांस मारण्यासाठी सैतान काहीही करू शकणार नाही.

## प्रतिनिधी म्हणून ठरविलेल्या पुढाऱ्यांचा आदर करा आणि त्यांच्यासोबत काम करा

✓ आपले पाळक सर्वकाही करू शकत नाहीत. म्हणून वेगवेगळया सेवाकार्यांची जबाबदारी इतर

अनेक पुढाऱ्यांस प्रतिनिधी म्हणून सोपविली आहे. आपण त्या पुढाऱ्यांचा मान राखू शकता, त्यांच्याशी सहकार्य करू शकता, आणि त्यांच्यासोबत काम करू शकता. जर आपण प्रतिनिधीत पुढाऱ्याचा मान राखत असाल ज्यांना मंडळीत ठेवण्यात आले आहे, तर आपण पाळकांची मदत कराल. उदाहरणार्थ, सदस्यांची निगा राखणारा पाळक, मुलांच्या चर्चचा पाळक, सेल पाळक, तरुणांचा पाळक, उपासना चमूचा पाळक, इत्यादी असू शकतात. जर आपली एखादी गरज असेल, तर त्या सेवाक्षेत्रातील पुढाऱ्यास डावलून प्रत्यक्ष आपल्या पाळकापर्यंत जाण्याचा प्रयत्न करू नका. ज्यांना विविध सेवाकार्यांत पुढारी म्हणून नेमण्यात आले असेल त्यांचा मान राखा. थेट त्यांना आपल्या समस्या सांगा आणि त्यांना त्या हाताळण्याची संधी द्या. असा विचार करू नका की विशिष्ट सेवेच्या पुढाऱ्यास अनुभव नाही. तुमच्या समस्या सोडविण्याची त्यांना आपण संधी दिली नाही, तर आपण आवश्यक त्या अनुभवापासून त्यांना दूर ठेवत आहा. लक्षात ठेवा की पाळकाला सेवा पुढाऱ्यांमध्ये पूर्ण विश्वास आहे आणि तुमचे ऐकण्यापूर्वी ते त्यांचे ऐकतील.

**1 तीमथ्य. 5:17-19**

**17 जे वडील चांगल्या प्रकारे आपला अधिकार चालवतात, विशेषेकरून जे उपदेश व शिक्षण ह्या बाबतींत श्रम घेतात ते दुप्पट सन्मानास योग्य गणले जावेत.**

**18 कारण शास्त्र म्हणते, “बैल मळणी करत असता त्याला मुसके बांधू नकोस,” आणि “कामकर्याला आपली मजुरी मिळणे योग्य आहे.”**

**19 ‘दोन किंवा तीन साक्षीदार’ असल्यावाचून कोणत्याही वडिलावरील आरोप स्वीकारू नकोस.**

## मंडळीच्या पाचारणासह आणि दृष्टांतासह पुढे चला

**आमोस 3:3**

**पूर्वसंकेत केल्याशिवाय दोघे जण एकमेकांबरोबर चालतील काय?**

**मार्क 3:25**

**25 आपसांत फूट पडलेले घरही टिकत नाही.**

✓ स्थानिक मंडळीचा भाग असलेल्या प्रत्येकाने परमेश्वराने त्या मंडळीवर ठेवलेल्या दृष्टांतासोबत आणि पाचारणासोबत पुढे गेले पाहिजे. प्रत्येक स्थानिक मंडळीला एक विशिष्ट पाचारण असेल आणि प्रत्येक सदस्याने त्या पाचारणासोबत पुढे जाण्यास शिकले पाहिजे. उदाहरणार्थ, जर सेल चर्च असणे हा एका स्थानिक मंडळीचा दृष्टांत असेल, तर सदस्य असे म्हणू शकत नाहीत की त्यांना सेल ग्रुप आवडत नाही आणि ते कोणत्याही सेल ग्रुपचा भाग बनणार नाहीत. मंडळी ते सामुहिकरित्या करीत आहे आणि प्रत्येकाने त्यात सहभागी व्हावे.

- ✓ परमेश्वर मंडळीसाठी आपली योजना उलगडत असतांना, तो नवीन गोष्टींना जन्म देईल जी त्यांनी करावी अशी त्याची इच्छा आहे. म्हणून पाळकास आणि मंडळीच्या पुढाऱ्यांस मदत करा. बदलाचा आणि परमेश्वर ज्या नवीन गोष्टींत मंडळीचे मार्गदर्शक करीत आहे, त्यांचा विरोध करू नका. देहासोबत पुढे चला, त्याच दिशेने पुढे चालत जा, आणि पुढाऱ्यांचे समर्थन करा.

- ✓ जेव्हा आपण एखाद्या मंडळीस भेट देता, तेव्हा आपल्या मनात ही पूर्वकल्पना असू शकते की ते कसे असले पाहिजे. ती कल्पना आपणास मंडळीच्या दृष्टांतासोबत पुढे जाण्याच्या विचारापासून अडखळण आणत असेल. म्हणून आपणास आपला व्यक्तिगत कार्यक्रम बाजूला ठेवण्याची आणि जेथे मंडळी जात आहे तेथे पुढे जाण्याची गरज आहे.

- ✓ चर्चसोबत “डेट” करू नका. असा व्यक्ती बनू नका जो काही मिळेपर्यंत चर्चला जातो, जोवर त्याला खुश ठेवले जाते तोवर तो चर्चला जातो. ज्या दिवशी चर्च त्याला नाराज करते, त्या दिवशी त्याने मंडळी सोडून आणखी कुठे जाण्याचा निर्णय घेऊ नये. आपल्याला काय मिळेल याचा फक्त शोध घेऊ नका. जास्त नव्हे तर, जितके आपल्याला मिळाले आहे तितके द्या. येशूने म्हटले की घेण्यापेक्षा देणे बरे (प्रे. कृत्ये 20:35). आपणास मंडळीकडून मिळेल - ज्ञान आणि समज; आपण परिपूर्ण व्हाल आणि अशा ठिकाणी पोहोचाल जेथे आपण ख्रिस्तामध्ये पूर्णत्वास पोहोचला असाल.

## मंडळीच्या विश्वासासोबत आणि शिकवणीसोबत पुढे वाढा

**1 करिंथ 1:10**

**10 बंधुजनहो, आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्या नावाने मी तुम्हांला विनंती करतो की, तुम्हा सर्वांचे बोलणे सारखे असावे; म्हणजे तुमच्यामध्ये फुटी पडू नयेत; तुम्ही एकचित्ताने व एकमताने जोडलेले व्हावे.**

- ✓ “विश्वासमतामध्ये” अभिव्यक्त करण्यात आलेला मंडळीचा विश्वास आणि शिकवण सामान्यतः मंडळीची स्थापना करण्यापूर्वी लिहिली जाते.

- ✓ मंडळीच्या विश्वासमतात ”फेरबदल“ केला जात नाही आणि त्यावर चर्चा करण्याची परवानगी नसते.

- ✓ कोणत्याही मंडळीचा भाग बनण्याचा निर्णय घेण्यापूर्वी त्या मंडळीचा विश्वास आणि शिकवण वाचा व समजून घ्या.

- ✓ स्थानिक मंडळीचा भाग बनल्यानंतर विश्वासमत बदलण्याचा कुठलाही प्रयत्न करू नका. जर आपण त्या मंडळीच्या विश्वासाशी आणि शिकवणीशी सहमत नसाल, तर आपण यापैकी काहीही करावयास स्वतंत्र आहा - त्या चर्चसोबत शिका आणि वाढा किंवा दुसरे चर्च शोधा. आपणावर तेथे राहण्याचे कुठलेही बंधन नाही.

- ✓ मंडळीच्या विश्वासाशी आणि शिकवणीशी सहमत नसलेल्या आपल्या व्यक्तिगत विश्वासास स्वतःजवळ ठेवावे. उदाहरणार्थ, जर मंडळी पवित्र आत्म्याच्या बापतिस्माच्या बायबल आधारित सिद्धांताशी, अन्यान्य भाषेत बोलण्याशी, दैवी आरोग्यदानाशी किंवा इतर गोष्टींशी सहमत असेल, तर मंडळीकडून अपेक्षा केली जाते की त्यांनीही मंडळीसोबत सहमत असावे. मंडळीचा विश्वास आणि शिकवणीशी सहमत नसलेल्या आपल्या व्यक्तिगत विश्वासमतांचा प्रचार करण्यासाठी मंडळीचा उपयोग करू नका. तसेच कृपा करून आपल्या पाळकास किंवा इतर पुढाऱ्यांस पत्रे, ई-मेल आणि मंडळीच्या विश्वासमताविरूद्ध असलेली पुस्तके पाठवून त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करू नका.

## सेवक बना

**इफिस 4:11-13**

**11 आणि त्यानेच कोणी प्रेषित, कोणी संदेष्टे, कोणी सुवार्तिक, कोणी पाळक व शिक्षक असे नेमून दिले;**

**12 ते ह्यासाठी की, त्यांनी पवित्र जनांना सेवेच्या कार्याकरता व ख्रिस्ताच्या शरीराची रचना पूर्णतेस नेण्याकरता सिद्ध करावे.**

**13 देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या व तत्संबंधी परिपूर्ण ज्ञानाच्या एकत्वाप्रत, प्रौढ मनुष्यपणाप्रत, ख्रिस्ताची पूर्णता प्राप्त होईल अशा वृद्धीच्या मर्यादेप्रत आपण सर्व येऊन पोहचू तोपर्यंत दिले...**

- ✓ इफिस 4:11-13 म्हणते की पाच प्रकारची सेवा प्रत्येक पवित्र जनास सेवेच्या कार्यासाठी सिद्ध करण्याकरिता देण्यात आली आहे. प्रत्येक पाळकाची इच्छा हे पाहणे आहे की प्रत्येक विश्वासणाऱ्याने परमेश्वराचा सेवक बनावे. तेथवर पोहोचण्यासाठी थोडा वेळ लागू शकतो, पण पाळक आणि पुढारी या नात्याने, आमची इच्छा आहे की आपण तेथे जावे. आमची इच्छा आहे की आम्ही अशा ठिकाणी असावे जेथे आपण त्याच पदावर परमेश्वराची सेवा करावयास सुरूवात कराल. आपणापैकी प्रत्येकास कृपादाने, गुण, आणि पात्रता देण्यात आले आहेत. परमेश्वराने आपणामध्ये काही गुणकौशल्ये ठेविली आहेत. त्याने आपणामध्ये अशा गोष्टींची गुंतवणूक केली आहे ज्यांचा उपयोग आपण त्याच्या राज्यासाठी करावा असे त्याला वाटते. परमेश्वराची सेवा करा आणि परमेश्वराचे सेवक बना. थोडा वेळ बाकावर बसून राहणे ठीक

आहे, पण कालांतराने आपणास बाकावरून उठावे लागेल!

- ✓ ख्रिस्ताच्या मंडळीमध्ये आपणासाठी एक विशिष्ट स्थान आहे. आपले स्थान शोधा आणि मंडळीमध्ये आपणासाठी परमेश्वराने नेमिलेले कार्य पार पाडा. आपण फक्त मंडळीचे सभासद नाही; आपण परमेश्वराचे सेवक आहात. ख्रिस्ताच्या देहामध्ये कार्य करणे सुरू ठेवा.

**1 करिंथ 12:18**
**18 तर देवाने आपल्या इच्छेप्रमाणे शरीरामध्ये प्रत्येक अवयव लावून ठेवला आहे.**

जेव्हा आपण परमेश्वराची सेवा करावयास सुरूवात करता, तेव्हा काही निर्देशांचे पालन करावयाचे असते.

- ✓ सर्वप्रथम, कृपादानापेक्षा चारित्र्याचे महत्व आहे हे समजून घ्या. पाळक कृपादान मुक्त करण्यापूर्वी चारित्र्याच्या शोधात असतील कारण त्यासोबत आपणास चारित्र्याची गरज भासेल. उदाहरणार्थ, जर आपणाजवळ एखादे विशिष्ट कृपादान लाभले असेल, तर पाळक त्या कृपादानाचा उपयोग करण्याची आपणास संधी देईल आणि त्याचवेळी आपल्या चारित्र्याचे निरीक्षण करील. जर चारित्र्य विश्वसनीय असेल, तर पाळक आपल्या कृपादानाचा उपयोग करण्यासाठी आणखी वाव देईल. समजा जर चारित्र्याचा अद्याप विकास झाला नसेल, तर ते आपणास काही काळ तेथे ठेवते, जोवर वैय्यक्तिक सवय, समस्या, अथवा वाईट प्रवृत्तीवर विजय मिळेपर्यंत. पाळक लगेच पहिल्या दिवशी आपणास बढती देणार नाही! आपणास चारित्र्याची गरज आहे जे इच्छित पदावर पोहोचल्यानंतर आपणास संभाळून घेईल, अन्यथा त्या प्रक्रियेत आपण स्वतःस तसेच इतर अनेक लोकांस इजा करू शकता.

- ✓ विश्वास जिंकून घ्या. आपल्या पाळकांनी आपला विश्वास जिंकून घेतला पाहिजे.

- ✓ स्वतःकडे लक्ष वेधून घेऊ नका. काही लोकांना जेव्हा परमेश्वराच्या घरात सेवेची जबाबदारी सोपविली जाते, तेव्हा ते इतर विश्वासणाऱ्यांमध्ये “लोकप्रिय” स्त्री किंवा पुरुष बनतात. या मागे इच्छा ही असते की लोकांनी आपल्याकडे लक्ष द्यावे आणि शेवटी प्रभूकडे अंगूलीनिर्देश करण्याऐवजी ते लोकांस स्वतःकडे ओढतात. म्हणून याची खात्री करून घ्या की सेवा करीत असतांना लोकांनी आपणाकडे आकर्षित होऊ नये - तर प्रभूकडे आकर्षित व्हावे.

- ✓ आधी आपली सेवा प्रगट करा, आणि नंतर लोक आपले पाचारण ओळखतील. योग्य सेवा प्रगट न करता आपल्या पाचारणाची जाहीरात करू नका (“मी प्रेषित आहे”). जर आपले

पाळक त्यांच्याजवळ मंडळी नसतांना स्वतःची पाळक म्हणून घोषणा करीत असते, तर ते किती हास्यास्पद दिसले असते याचा विचार करा. आपणास जे करण्यासाठी पाचारण करण्यात आले आहे ते करा आणि आपले पाचारण आणि सेवा दिसून येईल. लोकांस फळे दिसू द्या आणि मग ते ओळखतील की आपला वृक्ष कोणत्या प्रकारचा आहे!

- ✓ स्वतःस पुढे करू नका. निमंत्रण मिळण्याची वाट पाहा. येशूने म्हटले की जेव्हा आपण मोठ्या मेजवानीस जातो, तेव्हा आपण मागच्या बैठकीत बसले पाहिजे, यजमानाने स्वतः येऊन आपणास पुढे येण्याचे निमंत्रण दिले पाहिजे. यात जास्त मान आहे. समजा तुमचा आवाज मधुर आहे आणि तुम्हाला एखादे संगीतवाद्य वाजविण्याची कला आहे. जाऊन उपासना पुढाऱ्यास असे म्हणू नका की आपण एक थोर संगीत गायक आहात आणि आपणास तेथे वाजविण्याची संधी मिळाली पाहिजे. त्याऐवजी आपले गुण दिसू द्या आणि वाजविण्याचे किंवा उपासना चालविण्याचे निमंत्रण मिळण्याची वाट पाहा. त्या दरम्यान तुम्हाला साक्षात्कार द्यावा लागेल आणि वाजविण्यास सुरूवात करण्यापूर्वी नियमितपणे सरावासाठी यावे लागेल.

- ✓ आपल्या पाळकास आणि पुढाऱ्यास जबाबदार राहा. सूचनांचे अनुसरण करा आणि गोष्टींच्या प्रवाहाशी जुळून राहा. आपल्या आवेशाने प्रभू मंडळीला/चर्चला जे करण्यास प्रवृत्त करीत आहे त्यात व्यत्यय आणू देऊ नका.

- ✓ आपल्या प्रतिफळासाठी परमेश्वराकडे पहा. अनेक लोकांना व्यासपीठावरून प्रशंसेच्या स्वरूपात किंवा काही विशिष्ट प्रकारच्या टाळयांच्या स्वरूपात त्यांचे बक्षीस पाळकाकडून मिळण्याची अपेक्षा आहे. हे सर्व शक्य आहे, पण तसे न झाल्यास निराश होऊ नका किंवा कटू होऊ नका! आपण परमेश्वराची सेवा करता आणि आपले प्रतिफळ त्याच्याकडून येते.

## वचनबद्धता दाखवा

**2 तीमथ्य 2:2**

**2 ज्या गोष्टी तू पुष्कळ साक्षीदारांसमक्ष माझ्यापासून ऐकल्या, त्या इतरांना शिकवण्यास योग्य अशा विश्वासू माणसांना सोपवून दे.**

- ✓ क्षमतेपेक्षा विश्वासूपणा जास्त महत्त्वाचा आहे. पाळक विश्वासू लोकांच्या शोधात आहे. "स्थिर मनाच्या मनुष्याला आशीर्वादांची रेलचेल होते; पण जो धनवान होण्याची उतावळी करतो त्याला शिक्षा झाल्यावाचून राहत नाही." (नीतिसूत्रे 28:20).

- ✓ जेव्हा आपण एखादी जबाबदारी स्वीकारता, तेव्हा आपण त्याबाबत विश्वासू आहात याची

खात्री करा. उदाहरणार्थ, जर आपण दर रविवारी 30 मिनिटे लवकर येऊन चर्च परिसर स्वच्छ करण्याचे वचन दिले असेल, तर कृपया आपण दर रविवारी ते करीत असल्याची खात्री करा. वचनबद्ध आणि विश्वासार्ह व्हा. जरी आपणास कार्य करण्यासाठी पैसे दिले जात नसले, जरी आपण केवळ एक स्वयंसेवक असला तरीही, एक विश्वासू स्वयंसेवक व्हा.

- ✓ पाळकांस समजते की अशा अनपेक्षित गोष्टी येतील ज्यामुळे तुम्हाला मदत करणे अशक्य होईल. जर आपण ते पूर्ण करू शकत नसाल, तर आपण ते शक्य तितक्या लवकर कळवा.

- ✓ आपण जे करता त्याचा आनंद घ्या. एखादी व्यक्ती जर कुरकुर करून काम करीत असेल तर ते काम करणे फार आनंददायक नसते. जर आपणास एखादे काम करण्यात मजा येत नसेल, तर ते न केलेले बरे.

- ✓ हे प्रभूसाठी करा पाळकासाठी नाही. लक्षात ठेवा आपण फक्त आपल्या पाळकाला संतुष्ट करण्यासाठी काहीही करू नका, ते प्रभूसाठी करा.

## उत्कृष्टतेचा पाठपुरावा करा

- ✓ "जे काही आपण कराल ते उत्तमप्रकारे करा. परमेश्वराला आपले सर्वोत्तम द्या. अनेकदा आपण विचार करतो, "शेवटी मी स्वयंसेवा करीत आहे. मी हे फक्त सेवेसाठी करीत आहे." अशी आपली वृत्ती असू नये. जेव्हा आपण परमेश्वरासाठी काही करता तेव्हा ते चांगले करा आणि आपणास परमेश्वराने दिलेल्या क्षमतेनुसार ते करा. परमेश्वर आपणाजवळ असलेल्या सर्वोत्तम गोष्टींसाठी पात्र आहे!

## राज्याचे निर्माते बना

- ✓ जेव्हा आपण सेवा करता तेव्हा स्वतःला आठवण करून द्या की ही एखाद्या विशिष्ट स्थानिक मंडळीची सेवा करण्याची बाब नाही तर परमेश्वराचे राज्य निर्माण करणे आहे. लक्षात ठेवा की जरी आपण स्थानिक मंडळीचा भाग असला तरीही आपण हे राजांच्या राजासाठी करीत आहात. त्याचे राज्य निर्माण करण्यासाठी आपण हे करीत आहा. आपण सेवा करीत असलेल्या स्थानिक मंडळीच्या नावाच्या पलीकडे पहा, कारण ते फक्त एक नाव आहे.

- ✓ स्वार्थ आणि आत्मकेंद्रितपणा बाजूला ठेवा. आपल्या स्थानिक मंडळीचा प्रचार करण्यासाठी काहीही करू नका. लक्षात ठेवा की आपणास तेथे खास परमेश्वराच्या राज्याचा प्रचार

करण्यासाठी ठेवण्यात आले आहे. नेहमी ख्रिस्ताचे गौरव करा.

- ✓ सेवक, इतर सेवासंस्था आणि चर्च यांच्यात एकता वाढवा. इतर मंडळीतील विश्वासणाऱ्यांसोबत सहभागित्व करण्यास घाबरू नका. राज्याचे निर्माते व्हा. परमेश्वराच्या राज्याच्या दृष्टीने विचार करा. परमेश्वराच्या राज्याच्या निर्मितीसाठी आपण काय करू शकता आणि मंडळयांसोबत आणि सेवासंस्थासोबत कसे कार्य करावे हे स्वतःला विचारा, जेणेकरून आपल्यामध्ये ख्रिस्ताचा गौरव होईल.

# 3. आपला पाळक मानव आहे

कधी कधी लोक हे विसरून जातात की त्यांचा पाळक देखील मनुष्य आहे - सारख्याच आवडीनिवडी असलेला मनुष्य! (त्याला देखील चविष्ट अन्न आवडते!) येथे काही व्यावहारिक सूचना आहेत :

✓ माणसाला गरजेपेक्षा जास्त मान देऊ नका. काही लोक आपल्या पाळकाला “ख्रिश्चन सुपरस्टार” सारखे वागवतात आणि त्यांना वाटते की त्यांचा पाळक सुपरमॅन आहे. येथे एक सरळ सत्य आहे तुमचा पाळक ‘सुपरस्टार’ नाही किंवा ‘सुपरमॅनही’ नाही. म्हणून त्याला सुपरस्टारडमचा ‘अभिषेक’ करू नका! माणसाला गरजेपेक्षा जास्त महत्त्व देणे अधार्मिक आणि अनाठायी आहे. परमेश्वराने नियुक्त केलेल्या नेतृत्वाचा मान राखा, त्यांचा आदर करा, पण माणसाला अवाजवी महत्त्व देऊ नका.

**1 करिंथ 3:21**

**21 म्हणून माणसाविषयी कोणी अभिमान बाळगू नये. कारण सर्वकाही तुमचे आहे.**

**1 करिंथ 4:6**

**6 बंधुजनहो, मी तुमच्याकरता ह्या गोष्टी अलंकारिक रीतीने स्वतःला व अपुल्लोसाला लागू केल्या आहेत; ह्यासाठी की, शास्त्रलेखापलीकडे कोणी जाऊ नये हा धडा तुम्ही आमच्यापासून शिकावा म्हणजे तुमच्यापैकी कोणीही एकासाठी दुसऱ्यावर फुगणार नाही.**

✓ आपल्या पाळकावर अवलंबून राहू नका. आपणास आत्मिकरित्या वाढण्याची आणि प्रभूसोबत एकट्याने चालण्यास शिकण्याची गरज आहे. आपला पाळक मदतीसाठी आहे, पण प्रत्येक विश्वासणाऱ्यास परमेश्वरासोबत वैय्यक्तिक नात्याचा विकास करण्याची गरज आहे. स्वतः परमेश्वराचे वचन वाचण्याचा, त्याचा अभ्यास करण्याचा, त्याचे वचन आत्मसात करण्याचा प्रयत्न करा. स्वतः प्रार्थना करावयास आणि परमेश्वरावर विश्वास ठेवावयास शिका. ‘आत्मिक बालवाडीतून’ शिकून निघा आणि आत्मिक पिता किंवा माता बना जे विश्वासात इतरांची वाढ करण्यात मदत करतील.

✓ आपला अभिषेक परमेश्वराकडून प्राप्त होतो. हे खरे आहे की आत्मिक कृपादान अभिषिक्त पुढाऱ्याद्वारे आणि त्याच्यापासून येते, तरीही हे लक्षात ठेवा की शेवटी आपला अभिषेक परमेश्वराकडून येतो. अभिषेक देणारा परमेश्वर आहे. आपण अगदी आपल्या पाळकासारखाच अभिषेक प्राप्त करणार नाही. आपणास आपले स्वतःचे कृपादान व अभिषेक

परमेश्वराकडून प्राप्त करावे व वाढीस लावावे लागेल. आपल्या पाळकावर आणि आपल्या स्थानिक मंडळीवर जो अभिषेक आहे तो आपणास जे प्रभूकडून प्राप्त होते त्यात वाढ करू शकतो. पण शेवटी आपला अभिषेक परमेश्वरासमोर आपल्या चालचलनावर अवलंबून आहेत.

**योहान 3:27**

**27 योहानाने उत्तर दिले, “मनुष्याला स्वर्गातून दिल्यावाचून काहीच मिळू शकत नाही.**

**2 करिंथ 1:21**

**21 जो आम्हांला अभिषेक करून तुमच्याबरोबर ख्रिस्ताच्या ठायी सुस्थिर करत आहे तो देव आहे…**

✓ लगेच न्याय करण्याबाबत उतावीळ होऊ नका. अनुचित किंवा अवास्तव अपेक्षांमुळे, लोक खूप टीका करू शकतात आणि त्यांच्या पाळकांकडे जर त्यांनी चुका केल्या किंवा कोणत्याही प्रकारे त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात चुकले, तर अगदी सहजपणे पाठ फिरवू शकतात. ऑल पीपल्स चर्चमध्ये, मला खूप मदतशील आणि अत्यंत समजूतदार लोकांची मंडळी मिळाल्याचा आशीर्वाद लाभला आहे. तथापि, एक स्मरणपत्र म्हणून, मी हे येथे सांगत आहे - आपल्या पाळकावर दोष लावण्याची फार घाई करू नका. तुमचा पाळक, तुमच्यासारखा, आहे, अजूनही त्याच्या जीवनात काम सुरू आहे, एक इमारत अजूनही बांधकामाधीन आहे. त्यामुळे गोंधळ माफ करा आणि धीर धरा.

**1 करिंथ 4:3-5**

**3 तरी तुमच्याकडून किंवा मानवी न्यायाधीशाकडून माझा न्यायनिवाडा व्हावा, ह्याचे मला काहीच वाटत नाही, मी स्वतःचादेखील न्यायनिवाडा करत नाही.**

**4 कारण जरी माझे मन माझ्याविरुद्ध मला साक्ष देत नाही, तरी तेवढ्यावरून मी निर्दाेषी ठरतो असे नाही; माझा न्यायनिवाडा करणारा प्रभू आहे.**

**5 म्हणून त्या समयापूर्वी म्हणजे प्रभूच्या येण्यापूर्वी तुम्ही न्यायनिवाडा करूच नका; तो अंधारातील गुप्त गोष्टी प्रकाशात आणील आणि अंतःकरणातील संकल्पही उघड करील; आणि मग प्रत्येकाच्या योग्यतेप्रमाणे देव त्याची वाहवा करील.**

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळयांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (ब) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (क) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक/बँक ड्राफ्टच्या द्वारे ”ऑल पीपल्स चर्च, बेंगलोर“ च्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता:

Account Name: All Peoples Church

Account Number: 0057213809

IFSC Code: CITI0000004

Bank: Citibank N.A., No. 5,

M.G. Road, Bengaluru, Karnataka 560001

कृपया लक्षात ठेवाः ऑल पीपल्स चर्चजवळ एफसीआरए परमिट नाही. या कारणास्तव केवळ भारतीय नागरिकांचे बँक अंशदान स्वीकार करता येणार नाही. आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणज्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता.

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!

## FREE PUBLICATIONS

A Church in Revival*
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks*
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change*
Code of Honor
Divine Favor*
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling*
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Giving Birth to the Purposes of God*
God Is a Good God
God's Word
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife*
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses—Don't Take Them
Open Heavens*
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith *
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus *
The Night Seasons of Life
The Power of Commitment*
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power*
The Wonderful Benefits of speaking in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different*
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work Its Original Design

वरील सर्व पुस्तके पीडीएफ आवृत्तीत विनामूल्य डाऊनलोडसाठी आमच्या चर्चच्या संकेतस्थळावर apcwo.org/publications उपलब्ध आहेत. यापैकी काही पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. ह्या पुस्तकांची विनामूल्य मुद्रित प्रत प्राप्त करण्यासाठी ई-मेल या डाकद्वारे आमच्याशी संपर्क करावा.

तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी : **apcwo.org**

# ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च (एपीसी) चा दृष्टांत आहे.

एपीसीमध्ये आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्भुत कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4, 5; इबी. 2:3, 4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी : www.apcwo.org/locations किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा : contact@apcwo.org

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळयांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌भुत गोष्टी केल्या.

ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, “पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे” (रोमियों 6:23). येशूने जेव्हा वधस्तंभावर जेव्हा आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला. देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो

पाप्यांस तारावयास - आपल्यासाख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे - प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

“त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात” (प्रेषितांची कृत्ये 10:43).

“की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल” (रोम. 10:9).

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याच्या स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.


आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.

आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि

तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते. येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर. आमेन.

## विनामूल्य ॲप डाऊनलोड करा

## ॲपमध्ये  गुगल प्ले स्टोर में “ऑल पीपल्स चर्च, बैंगलोर” शोधा.




दररोज 5 मिनिटांच्या वीडिओच्या माध्यमाने उपासना

दररोज बायबल वाचन आणि प्रेयर गाईड

5 मिनिटांच्या उपदेशाचा सारांश

जगात प्रगतीसाठी विविध विषयांवर पवित्र शास्त्राचे टूल किट तसेच सुवार्ता सांगण्यासाठी माहिती

उपदेश, उपदेशाच्या टीपा, टी. वी. कार्यक्रम, पुस्तके, संगीत, आणि बरेच काही.

जर हे आपणास आवडले असेल तर इतरांस सांगा.

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र (एपीसी-बीसी) भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्भुत कृत्ये यावर जोर दिला जातो - सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

एपीसी-बीसी मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत :

Theology and Christian Ministry (C.Th.) में एक वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम
Theology and Christian Ministry (D.Th.) में दो वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम
Bachelor in Theology and Christian Ministry (B.Th.) में तीन वर्षीय प्रमाणपत्र अभ्यासक्रम

दर आठवड्यास सोमवार ते शुक्रवार या दरम्यान सकाळी 9 ते दुपारी 1 वाजेपर्यंत वर्ग भरलेले असतात. विद्यार्थी, नोकरी करणारे आणि गृहिणी सर्व या वर्गांमध्ये उपस्थित राहू शकतात आणि दुपारी 1 नंतर कामावर जाऊ शकतात. तेथे राहण्याची इच्छा असलेल्या स्त्री आणि पुरुषांसाठी स्वतंत्र वसतिगृहांची सोय आहे. विद्यार्थी दर आठवड्यात दोन ते पाच तास क्षेत्रीय कार्य, विशेष परिसंवाद, दुपारी प्रार्थना आणि उपासना यात घालवतात. दुपारच्या सभा घरून येणार्या विद्यार्थ्यांसाठी ऐच्छिक आहेत. आठवड्याच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना एक किंवा अधिक स्थानिक चर्चेमध्ये सेवा करण्यास प्रोत्साहित केले जाते.

कॉलेज, विविध कार्यक्रम, अभ्यासक्रम याबद्दल अधिक माहितीसाठी आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी कृपया या साइटला भेट द्या : apcwo.org/biblecollege

APC-BC is
accredited by the Nations Association
for Theological Accreditation (NATA).

आपल्यापैकी जे पालक आहेत त्यांना माहीत आहे की मुलांचे संगोपन करीत असतांना, जरी आम्ही बहुतेक वेळा त्यांच्यावर प्रेमाचा वर्षाव करतो, तरी काही वेळा असे होते जेव्हा आम्हाला छडी काढावी लागते! याचे कारण असे नाही की आपण आपल्या मुलांचा तिरस्कार करतो पण यासाठी की आपण त्यांना मजबूत लोक बनविण्यासाठी त्यांचे संगोपन करू इच्छितो. त्याचप्रमाणे, जेव्हा आपल्याला चर्चमध्ये मजबूत लोक तयार करावयाचे असतात, तेव्हा आपण त्यांना परमेश्वराच्या मंदिरात काय करावे हे शिकवले पाहिजे.

दुःखाची गोष्ट ही आहे की या विषयावर फारशी शिकवण दिली जात नाही आणि प्रत्येक जण जे योग्य वाटेल ते करण्याचा प्रयत्न करतो. मंडळीतील लोक त्यांच्या मनात असेल ते करतात आणि चर्चला वेगवेगळ्या दिशेने खेचतात आणि अशा प्रकारे चर्च कुठेही जात नाही! जर प्रत्येकाने त्याला किंवा तिला जे योग्य वाटेल तसे केले तर आपल्याकडे अराजकता आणि गोंधळाने भरलेले प्रार्थनास्थळ असेल. पण परमेश्वर गोंधळाचा कर्ता नाही.

एक मजबूत चर्च बनविण्याच्या इच्छेने, त्यात मजबूत लोकांना तयार करून, मी हा संदेश देत आहे, “तुमच्या पाळकांना कशी मदत करावी?” मला विश्वास आहे की असे करण्यामागे माझ्या मनाची प्रेरणा आपणास समजेल.

आशीष रायचूर

**All Peoples Church & World Outreach**
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org